# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ़ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.**
**दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फ़ॅक्सः ०२२-२२१६ ३९७६.**
**ई-मेलः mercindia@mercindia.org.in**
वेब-साईट- www.mercindia.org.in

## जाहीर नोटीस

**विषयः उपलब्धतेवर आधारित वीज दराची (Availability Based Tariff - (ABT)) राज्य पातळीवरील व्यवस्था महाराष्ट्रात अंमलात आणणे व संबंधित बाबी - प्रकरण क्रमांक ४२/२००६**

केंद्र शासनाने दि. १२ फेब्रुवारी, २००५ रोजी अधिसूचित केलेल्या राष्ट्रीय वीज धोरणात नमूद करण्यात आले आहे की, केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने देश-पातळीवर सुरु केलेल्या एबीटी व्यवस्थेचा सकारात्मक परिणाम झाला आहे. या व्यवस्थेमुळे ज्या परवानेधारकांकडे शिल्लक वीज आहे त्यांना त्यांची शिल्लक वीज, वीजेच्या तुटवडयाला तोंड द्यावे लागणाऱ्या परवानेधारकांना हस्तांतरीत करुन या हस्तांतरणाचा दैनंदिन हिशोब करण्यासाठी एक विश्वासार्ह यंत्रणा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे, येत्या वर्षभरात एबीटी व्यवस्था राज्य पातळीवर सुरु करावी, असे राष्ट्रीय वीज दर धोरणाद्वारे राज्य विद्युत नियामक आयोगांना सुचविण्यात आले आहे. त्यानंतर ६ जानेवारी, २००६ रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या राष्ट्रीय वीज दर धोरणानुसार, वीज दराच्या क्रमवारीप्रमाणे विजेची खरेदी करणे शक्य व्हावे म्हणून सर्व दीर्घ मुदतींच्या करारांसाठी दोन भागातील वीज दराची रचना स्वीकारावयाची आहे आणि उपलब्धतेवर आधारीत वीज दर (Availability Based Tariff - (ABT)) व्यवस्था राज्य पातळीवर एप्रिल २००६ पर्यंत सुरु करावयाची होती.

२. प्रादेशिक पातळीवरील एबीटी व्यवस्थेचे यश आणि ग्रिड मधील कंप्रतेतील सुधारणा, कंप्रतेतील चढ-उतार कमी होणे आणि वीज पुरवठयातील व्यत्ययांची / ग्रिड बंद पडण्याच्या घटनांची संख्या कमी होणे, यामुळे ही व्यवस्था जर राज्य पातळीवर देखील अंमलात आणली तर ती विद्युत यंत्रणेला अधिक सहाय्यभूत ठरणार आहे.

३. एबीटी व्यवस्था राज्य पातळीवर सुरु करण्याचा तपशील ठरविण्यासाठी भारतीय विद्युत नियामकांच्या मंचाने मार्च २००५ मध्ये उप-समित्या स्थापन केल्या आहेत. या उप-समित्यांकडे (१) राज्यांतर्गत यंत्रणांमध्ये एबीटी व्यवस्था कार्यान्वित करण्यासाठी विद्युत नियामकांच्या मंचाला शिफारशी करणे आणि (२) मीटरींग बाबतच्या विनियमांसबंधात केंद्रीय विद्युत प्राधिकरणाशी समन्वय साधणे, ही दोन विशिष्ट कामे सोपविण्यात आली आहेत. यासंबंधी, प्रदीर्घ चर्चेनंतर राज्य पातळीवर एबीटी व्यवस्था कार्यान्वित करण्याबाबतच्या आपल्या शिफारशींना अंतिम रुप उप-समितीने नोव्हेंबर २००५ मध्ये दिले आहे. उप-समितीने मान्य केले आहे की या शिफारशी बंधनकारक नसून राज्य विद्युत नियामक आयोग आपापल्या राज्यात या विषयाबाबत निर्णय घेण्यासाठी पूर्णपणे सक्षम आहेत. तथापि, राज्य पातळीवर एबीटी व्यवस्था सुरु करताना राज्यातील एबीटी

व्यवस्था ही आंतर-राज्य एबीटी व्यवस्थेशी विसंगत नसेल, याची खात्री करण्याची सूचना उप-समितीने केली आहे.

४. यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, राज्य पातळीवर एबीटी व्यवस्था सुरु करताना - तिची व्याप्ती, वीज दर ठरविण्याची पद्धत, राज्यातील काही सहयोगींना वगळणे इ. बार्बीवर संबंधित राज्य विद्युत नियामक आयोगांना निर्णय घेण्याचा अधिकार आहे. तथापि, राज्य पातळीवरील एबीटी व्यवस्था याचा अर्थ प्रादेशिक पातळीवर लागू करण्यात आलेल्या विना-अनूसूचित आंतरबदल (Unscheduled Interchange - UI) यंत्रणेशी निगडीत कंप्रता, असा घेण्याची गरज नाही.

५. तथापि, महाराष्ट्रात एबीटी व्यवस्था सुरु करण्याकरिता उचित यंत्रणा निश्चित करण्यापूर्वी, राज्य पातळीवरील विद्युत क्षेत्रातील विशिष्ट बाबी आणि अडचणी निश्चित करण्याची गरज आहे. त्याशिवाय, राज्यातील बहुतांश यंत्रणा (विभाजना पूर्वीच्या) एकत्रित कंपन्या म्हणून अस्तित्वात होत्या त्यावेळी कंप्रतेशी निगडीत विना-अनूसूचित आंतरबदल (UI) वीज दर ठरविण्याच्या पद्धतीबरोबर एबीटी व्यवस्था सुरु करण्यात आली होती. अशारीतीने, राज्यातील सहयोगींनी त्यांच्या यंत्रणेचे संचालन चालू ठेवण्यासाठी त्यांच्या विद्युत भाराचे तसेच त्यांच्या विद्युत निर्मिती केंद्रावरील आपले नियंत्रण कायम ठेवून प्रादेशिक पातळीवर या व्यवस्थेला प्रतिसाद दिला आहे. राज्य कंपन्यांचे विभाजन / पुनर्रचना झाल्यानंतर, राज्यातील या विविध सहयोगींसह राज्य भार प्रेषण केंद्रांच्या, विद्युत अधिनियम २००३ अंतर्गत, कार्यात झालेले बदल समजून घेणे आवश्यक आहे.

६. त्यामुळे वरील परिस्थितीत, विद्युत उद्योगाच्या बदलत्या रचनेच्या संदर्भात, राज्य पातळीवर एबीटी व्यवस्था सुरु करण्याचा उद्देश निश्चित करणे आवश्यक आहे. याशिवाय राज्यपातळीवर एबीटी व्यवस्थेच्या अंमलबजावणीच्या उद्देशांची पूर्तता करताना, राज्यपातळीवर एबीटी व्यवस्था सुरु करण्यासाठी निवडलेल्या उचित यंत्रणेमुळे विद्युत क्षेत्रातील कंपन्यांवर आणि सामान्य ग्राहकांवर कमीत कमी परिणाम होईल, हे पाहणे आवश्यक आहे. या संदर्भात, राज्यातील विविध सहयोगींना राज्यातील एबीटी व्यवस्थेखाली आणताना उद्‌भवणारे अनेक प्रश्न आणि अनेक समस्यांचे विश्लेषण ″Introduction of Availability Based Tariff (ABT) Regime at State Level within Maharashtra and related issues″ या परिसंवाद पत्रिकेमध्ये मांडण्यात आले आहेत.

७. या संदर्भात, आयोगाने M/s ABPS Infrastructure Advisory - Deloitte Touche Tohmatsu India Pvt. Ltd. (DTT) यांना ″राज्य पातळीवरील एबीटी व्यवस्था सुरु करण्यासाठी उचित यंत्रणा″ विकसीत करण्यासाठी आणि या व्यवस्थेला अंतिम स्वरुप देण्यासंबंधातील आवश्यक नियामक कार्यवाही पूर्ण करण्यासाठी आयोगाला मदत करण्याकरीता नेमले आहे. त्यांनी ″Introduction of Availability Based Tariff (ABT) Regime at State Level within Maharashtra and related issues″ यावर एक परिसंवाद पत्रिका सादर केली आहे. या परिसंवाद पत्रिकेचा इंग्रजीमधील कार्यकारी गोषवारा लेखी विनंती द्वारे आयोगाच्या कार्यालयात विनामूल्य मिळू शकेल. या परिसंवाद पत्रिकेची इंग्रजीतील छापील प्रत हवी असल्यास ती आयोगाच्या कार्यालयातून रु.६५/- (गरजेनुसार, पोस्टेज साठी अतिरीक्त रु.५५/-) भरुन इंग्रजीतील

कार्यकारी गोषवाऱ्यासह मिळू शकेल. तसेच ते आयोगाच्या www.mercindia.org.in या वेबसाईटवर देखील उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

८. महाराष्ट्रात एबीटी व्यवस्था सुरु करण्यासाठी प्रस्तावित यंत्रणेवर, महाराष्ट्र राज्यातील विविध कंपन्या आणि हितसंबंधितांकडून आयोग त्यांच्या सूचना / अभिप्राय मागवित आहे. या सूचना / अभिप्रायाचे प्रतिज्ञापत्र आयोगाच्या कार्यालयात **दिनांक १३ डिसेंबर, २००६** रोजी किंवा त्यापूर्वी सादर करण्यात यावे.

९. मला असेही कळविण्याचे आदेश आहेत की, या संदर्भात प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी, परवानेधारक आणि विद्युत निर्मिती कंपन्यांच्या उपस्थितीत जाहीर सुनावणी **गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २००६ रोजी सकाळी ११:०० वाजता सेमिनार हॉल, ३१वा मजला, केंद्र १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५** येथे आयोजित करण्यात आली आहे.

सही/-
(मालिनी शंकर)
सचिव, मविनिआ,

मुंबई,
१७ नोव्हेंबर,२००६